# महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग
# नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,नाशिक
## (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक)

म्हाडा MHADA

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम-१९७६ च्या अंतर्गत (भू-विनियोग) नियम-१९८१ आणि (मालमत्ता व्यवस्थापन, गाळयांची विक्री,हस्तांतरण, आणि अदलाबदल) विनियम-१९८१ तसेच (भू-विनियोग) विनियम-१९८२ अन्वये व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणांच्या अधिन राहून **१) आडगाव गट क्रं. ६०९,नाशिक २) म्हसरुळ-स.क्र. २१७/४अ नाशिक. ३) मखमलाबाद- गट क्रं. ४४८/५+६, नाशिक , ४) स.क्रं. ४३/२ब/२ व ४३/ब/१अ/२ पंचक, नाशिक** येथील खालीलप्रमाणे सदनिका **प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्याने अर्ज पात्रतेच्या काही अटी शिथिल करुन एक रक्कमी खरेदी पध्दतीने** वाटप करण्यास्तव पात्र अर्जदारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत. **अर्जदार एकापेक्षा अधिक सदनिका घेऊ शकतो.** योजनेचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**** तिसरी जाहिरात ****

### गट क्रं. ६०९, आडगाव — तिसरी जाहिरात

| अ.क्र | तपशिल | १९२/१८० सदनिका (1BHK) पैकी १३५ सदनिका अत्यल्प उत्पन्न गट (EWS) | ११२/१०६ सदनिका (1BHKI) पैकी ८२ सदनिका अल्प उत्पन्न गट (LIG) | ११२/१०७ सदनिका (2BHK) पैकी ९६ सदनिका मध्यम उत्पन्न गट (MIG) |
|---|---|---|---|---|
| ०१ | योजनेचे ठिकाण | आडगाव-म्हसरुळ लिंक रोड, डॉ. वसंतराव पवार मेडीकल कॉलेज पासुन अंदाजे १ कि.मी. अंतरावर तसेच जत्रा हॉटेल समोरील धात्रक फाटयापासुन अंदाजे १.५ कि.मी. अंतरावर पोहच रस्ता, आडगाव, नाशिक. | | |
| ०२ | वाटपाची पध्दत | प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्याने | | |
| ०३ | सदनिकांची संख्या | १३५ सदनिका | ८२ सदनिका | ९६ सदनिका |
| ०४ | इमारत बांधकामाचे स्वरुप | आर.सी.सी.प्री-फॅब टेक्नॉलॉजी इमारत बांधकाम (तळमजला +७ मजले) | आर.सी.सी.प्री-फॅब टेक्नॉलॉजी इमारत बांधकाम (पार्कींग + ७ मजले) | आर.सी.सी.प्री-फॅब टेक्नॉलॉजी इमारत बांधकाम (पार्कींग + ७ मजले) |
| ०५ | सदनिकेचा तपशील | बैठक खोली, १ शयनकक्ष, स्वयंपाकगृह व अटॅच टॉयलेट,ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स. | बैठक खोली (बाल्कनीसह), १ शयनकक्ष, स्वयंपाकगृह, एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम,ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स. | बैठक खोली (बाल्कनीसह), २ शयनकक्ष, (एकास अटॅच टॉयलेट) स्वयंपाकगृह,१ स्वतंत्र अटॅच टॉयलेट व बाथरुम , ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स |
| ०६ | सुविधा | प्रत्येक इमारतीत एक लिफ्ट, २ प्रशस्त जिन्यासह, फायर फायटिंगची सुविधा, प्रशस्त गार्डन, रस्ते व सामाईक संरक्षक भिंत. | इमारतीत प्रशस्त सोसायटी कार्यालय, एक लिफ्ट सुविधा, प्रशस्त २ जिन्यासंह फायर फायटींगची सुविधा, तळमजल्यावर सामाईक कव्हर्ड पार्किंग, प्रशस्त गार्डन, रस्ते व सामाईक संरक्षक भिंत. | इमारतीत प्रशस्त सोसायटी कार्यालय, एक लिफ्ट सुविधा, प्रशस्त २ जिन्यासंह फायर फायटींगची सुविधा, तळमजल्यावर सामाईक कव्हर्ड पार्किंग, प्रशस्त गार्डन, रस्ते व सामाईक संरक्षक भिंत. |
| ०७ | एका सदनिकेचा बिल्टअप एरीया | ४२.५९ चौ.मी. (४५८.४३ चौ. फूट) | ७२.०७ चौ.मी. (७७५.७६ चौ. फूट) | ९०.०९ चौ.मी. (९६९.७२ चौ. फूट) |
| ०८ | एका सदनिकेचा कारपेट एरीया | २८.११ चौ.मी. (३०२.५७ चौ. फूट) | ४४.४२ चौ.मी. (४७८.१३ चौ. फूट) | ५८.९५ चौ.मी. (६३४.५३ चौ. फूट) |
| ०९ | एका सदनिकेची अंदाजित विक्री किंमत (३० वर्षाचे भांडवलीकरण करुण लिज रेन्टसह) | रु.१०,८८,९५३/- | रु.१८,४५,४४७/- | रु.२५,९३,८२५/- |
| १० | अर्जासोबत भरावी लागणारी रक्कम | रु. १०,०००/- | रु. १५,०००/- | रु. २५,०००/- |
| ११ | सदनिका ताब्यात घेण्यापूर्वी भरावी लागणारी रक्कम (अर्जासोबत भरलेली रक्कम वगळून) | रु.१०,७८,९५८/- | रु.१८,३०,४४७/- | रु.२५,६८,८२५/- |
| १२ | अर्जदाराचे सरासरी मासिक उत्पन्न मर्यादा | शिथील क्षम | | |
| १३ | आरक्षणाचा तपशिल | | | |

| अ.क्रं. | विगतवारी | सदनिका संख्या | अ.क्रं. | विगतवारी | सदनिका संख्या | अ.क्रं. | विगतवारी | सदनिका संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अनुसूचित जाती | १४ | ०१ | अनुसूचित जाती | ०४ | ०१ | अनुसूचित जाती | ०९ |
| ०२ | अनुसूचित जमाती | १० | ०२ | अनुसूचित जमाती | ०६ | ०२ | अनुसूचित जमाती | ०५ |
| | | | ०३ | भटक्या जमाती | ०१ | ०३ | भटक्या जमाती | ०२ |
| ०३ | विमुक्त जाती | ०२ | ०४ | विमुक्त जाती | ०२ | ०४ | विमुक्त जाती | ०१ |
| ०४ | सर्व साधारण जनता | १०९ | ०५ | सर्व साधारण जनता | ६९ | ०५ | सर्व साधारण जनता | ७९ |

### स.क्रं. २१७/४अ. म्हसरुळ, नाशिक — तिसरी जाहिरात / स.क्रं. ४४८/५+६, मखमलाबाद, नाशिक — तिसरी जाहिरात

| अ.क्र | तपशिल | ४२/३३ सदनिका (2BHK) पैकी २८ सदनिका मध्यम उत्पन्न गट (MIG-I) | १४/११ सदनिका (1BHK) पैकी ०२ सदनिका मध्यम उत्पन्न गट (MIG-II) | ११२/१०६ सदनिका (2BHK) पैकी १०४ सदनिका मध्यम उत्पन्न गट |
|---|---|---|---|---|
| ०१ | योजनेचे ठिकाण | आकाश पेट्रोल पंपामागे, प्रजापिता ब्म्हाकुमारी सेवा केंद्राजवळ, कलानगर, म्हसरुळ, नाशिक | | आर.टी.ओ. कार्यालयासमोर, कृषि उत्पन्न बाजार समिती जवळ,मखमलाबाद, नाशिक |
| ०२ | वाटपाची पध्दत | प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्याने | | प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्याने |
| ०३ | सदनिकांची संख्या | २८ सदनिका | ०२ सदनिका | १०६ सदनिका |
| ०४ | इमारत बांधकामाचे स्वरुप | आर.सी.सी.प्री-फॅब टेक्नॉलॉजी इमारत बांधकाम (पार्कींग + ७ मजले) | | आर.सी.सी.प्री-फॅब टेक्नॉलॉजी इमारत बांधकाम (पार्कींग + ७ मजले) |
| ०५ | सदनिकेचा तपशील | बैठक खोली (बाल्कनीसह), २ शयनकक्ष, (एकास अटॅच टॉयलेट) स्वयंपाकगृह,१ स्वतंत्र अटॅच टॉयलेट व बाथरुम , ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स | बैठक खोली (बाल्कनीसह), १ शयनकक्ष, स्वयंपाकगृह, एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम,ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स. | बैठक खोली (बाल्कनीसह), २ शयनकक्ष, (एकास अटॅच टॉयलेट) स्वयंपाकगृह,१ स्वतंत्र अटॅच टॉयलेट व बाथरुम , ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६ | **सुविधा** | इमारतीत प्रशस्त सोसायटी कार्यालय, एक लिफ्ट सुविधा प्रशस्त २ जिन्यासंह फायर फायटींग सुविधा, तळमजल्यावर सामाईक कव्हर्ड पार्किग व संरक्षक भिंत. | | इमारतीत प्रशस्त सोसायटी कार्यालय, एक लिफ्ट सुविधा प्रशस्त २ जिन्यासंह फायर फायटींग सुविधा, तळमजल्यावर सामाईक कव्हर्ड पार्किग, प्रशस्त गार्डन, रस्ते व सामाईक संरक्षक भिंत. |
| ०७ | **एका सदनिकेचा बिल्टअप एरीया** | ९६.२८ चौ.मी. (१०३६.३५ चौ. फूट) | ७०.०१ चौ.मी. (७५३.५८ चौ. फूट) | ९५.१९ चौ.मी. (१०२४.६२ चौ. फूट) |
| ०८ | **एका सदनिकेचा कारपेट एरीया** | ६३.२६ चौ.मी. (६८०.९३ चौ. फूट) | ४६.०० चौ.मी. (४९५.१४ चौ. फूट) | ६३.२६ चौ.मी. (६८०.९३ चौ. फूट) |
| ०९ | **एका सदनिकेची अंदाजित विक्री किंमत (३० वर्षाचे भांडवलीकरण करुण लिज रेन्टसह)** | रु.२७,२८,६३९/- | रु.१९,८४,५०५/- | रु.२८,४१,९४३/- |
| १० | **अर्जासोबत भरावी लागणारी रक्कम** | रु. २५,०००/- | रु.२५,०००/- | रु.२५,०००/- |
| ११ | **सदनिका ताब्यात घेण्यापूर्वी भरावी लागणारी रक्कम (अर्जासोबत भरलेली रक्कम वगळून)** | रु.२७,०३,६३९/- | रु.१९,५९,५०५/- | रु.२८,१६,९४३/- |
| १२ | **अर्जदाराचे सरासरी मासिक उत्पन्न मर्यादा** | शिथील क्षम | | शिथील क्षम |
| १३ | **आरक्षणाचा तपशिल** | **अ.क्रं. / विगतवारी / सदनिका संख्या**<br>०१ / अनुसूचित जाती / ०४<br>०२ / अनुसूचित जामाती / ०१<br>०३ / विमुक्त जाती / ०१<br>०४ / सर्व साधारण जनता / २२ | **अ.क्रं. / विगतवारी / सदनिका संख्या**<br>०१ / अनुसूचित जामाती / ०१<br>०२ / भटक्या जमाती / ०१ | **अ.क्रं. / विगतवारी / सदनिका संख्या**<br>०१ / अनुसूचित जाती / १२<br>०२ / अनुसूचित जमाती / ०६<br>०३ / भटक्या जमाती / ०१<br>०४ / विमुक्त जाती / ०२<br>०५ / सर्व साधारण जनता / ८३ |

## स.क्रं. ४३/२ब/२ व ४३/ब/१अ/२ पंचक, नाशिक

## तिसरी जाहिरात

| अ.क्र | तपशिल | **१४० सदनिका (1BHKI) पैकी १३५ सदनिका अल्प उत्पन्न गट (LIG)** |
|---|---|---|
| ०१ | योजनेचे ठिकाण | **राज राजेश्वरी मंगल कार्यालयाच्या मागे पाठीमागे, रेल्वे लाईन जवळ, पंचक नाशिक** |
| ०२ | वाटपाची पध्दत | **प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्याने** |
| ०३ | **सदनिकांची संख्या** | १३५सदनिका |
| ०४ | **इमारत बांधकामाचे स्वरुप** | आर.सी.सी.प्री-फॅब टेक्नॉलॉजी इमारत बांधकाम (पार्कीग + ७ मजले) |
| ०५ | **सदनिकेचा तपशील** | बैठक खोली (बाल्कनीसह), १ शयनकक्ष, स्वयंपाकगृह, एक स्वतंत्र टॉयलेट व बाथरुम,ग्रिलसह ॲल्युमिनियम खिडक्या, व्हिट्रीफाईड टाईल्स. |
| ०६ | **सुविधा** | इमारतीत प्रशस्त सोसायटी कार्यालय, एक लिफ्ट सुविधा, प्रशस्त २ जिन्यासंह फायर फायटींगची सुविधा, तळमजल्यावर सामाईक कव्हर्ड पार्किग, प्रशस्त गार्डन, रस्ते व सामाईक संरक्षक भिंत. |
| ०७ | **एका सदनिकेचा बिल्टअप एरीया** | ७२.४७ चौ.मी. (७८०.०६ चौ. फूट) |
| ०८ | **एका सदनिकेचा कारपेट एरीया** | ४४.४२ चौ.मी. (४७८.१३ चौ. फूट) |
| ०९ | **एका सदनिकेची अंदाजित विक्री किंमत (३० वर्षाचे भांडवलीकरण करुण लिज रेन्टसह)** | रु. २६,०३,६७५/- |
| १० | **अर्जासोबत भरावी लागणारी रक्कम** | रु. १५,०००/- |
| ११ | **सदनिका ताब्यात घेण्यापूर्वी भरावी लागणारी रक्कम (अर्जासोबत भरलेली रक्कम वगळून)** | रु.२५,८८,६७५/- |
| १२ | **अर्जदाराचे सरासरी मासिक उत्पन्न मर्यादा** | शिथील क्षम |
| १३ | **आरक्षणाचा तपशिल** | **अ.क्रं. / विगतवारी / सदनिका संख्या**<br>०१ / अनुसूचित जाती / **१४**<br>०२ / अनुसूचित जमाती / **०९**<br>.०३ / विमुक्त जाती / **०२**<br>०४ / भटक्या जमाती / **०२**<br>०५ / सर्व साधारण जनता / **१०८** |

**अर्ज विक्री व अर्ज स्विकृतीचा कालावधी : दि. १७/१२/२०१५ पासुन ते पुरेसे अर्ज प्राप्त होईपर्यंत (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत) ॥ अर्ज विक्री किंमत :** रु. १०५/- **॥**

**अर्ज विक्री व स्विकृतीचे ठिकाण :**
**मिळकत व्यवस्थापक यांचे कार्यालय, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन,राम गणेश गडकरी चौक, आयकर भवनासमोर,नाशिक-४२२००२.**
**दुरध्वनी क्रं. ०२५३-२२२९२१२/२२२९२२८ ॥ ई-मेल: emmhadansk@gmail.com ॥ वेबसाईट : www.mhada.maharashtra.gov.in ॥**

**अधिक माहितीसाठी संपर्क**
१. श्री.बी.पी.भावसार,मिळकत व्यवस्थापक-९८२२०६५१९७
२. श्री.आर.जे.सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक-९९२२३६०२५७

**अटी व शर्ती :**

१. योजनेतील सदनिका वाटपासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती अर्ज विक्रीच्या ठिकाणी उपलब्ध होतील, त्या अर्जदारास बंधनकारक राहतील. २) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी (गेल्या २० वर्षापैकी किमान सलग १५ वर्ष महाराष्ट्रात रहिवास) असावा व त्याचे वय अर्ज करते वेळी १८ वर्षापेक्षा कमी नसावे.३)सदनिकांची किमंत अंदाजित असून त्यात वाढ झाल्यास ती भरणे बंधनकारक राहील.४)वाटप पत्रावर संबंधित मुद्रांक जिल्हाधिका-याकडे मुद्रांक शुल्काचा भरणा स्वतंत्ररित्या करणे आवश्यक राहील, त्यानंतरच सदनिकेचा ताबा प्राप्त होऊ शकेल.५)अर्ज हे सुवाच्य अक्षरात अचूक व परिपूर्ण भरलेले असावेत तसेच त्यासोबत भरावयाच्या रकमेचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा किंवा शेडयुल्ड बँकेचा डी.डी अर्जासोबत जोडावा. डी.डी. हा ***महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण*** अथवा ***म्हाडा नाशिक (MHADA NASHIK)*** या नावाने घेवून तो नाशिक शाखेवर देय असावा.६)अनामत रक्कमेवर व्याज देय नाही.७) अर्जदाराचे स्वत:चे बँक खाते असणे बंधनकारक आहेस. सदर खात्यामधूनच डिमांड-ड्राफ्टव्दारे अनामत रक्कमेचा भरणा करण्यात यावा. अर्जदाराचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेचे नाव, शाखा, बँक खाते क्रमांक इ. माहिती अर्जामधे नमूद करणे बंधनकारक आहे. ८) शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती (S.C.),अनुसूचीत जमाती (S.T.), भटक्या जमाती (N.T.), विमुक्त जाती (V.J) या प्रवर्गातील यशस्वी अर्जदाराला सक्षम प्राधिका-याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र (Cast Validity Certificate) सादर करणे अनिवार्य राहील. सदर जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय सदनिका वाटप करता येणार नाही. ९) चटई क्षेत्र/बांधकाम क्षेत्रात किरकोळ बदल संभवतात.१०) सदनिकांची संख्या व क्षेत्रफळ कमी-जास्त होण्याची शक्यता आहे. ११) अर्जदारास सदनिका किंमती व्यतिरीक्त सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी म्हाडा निश्चित करेल त्याप्रमाणे किमान १ वर्षाचे देखभाल दुरूस्ती सेवा शुल्क भरणे अनिवार्य आहे.

**** सदनिकांच्या वितरणासाठी व अर्ज विक्री करण्यासाठी नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी,सल्लागार व प्रापर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही व्यक्तीशी परस्पर व्यवहार करु नये. तसे केल्यास कोणत्याही व्यवहारास/फसवणुकीस नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा जबाबदार राहणार नाही.**

**सरिता नरके**
**मुख्य अधिकारी,**
**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.नाशिक**

महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग

# नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,नाशिक

(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणचा विभागीय घटक)

म्हाडा MHADA

**योजनेचे नांव:-** **गट क्रं. ६०९, आडगाव, नाशिक, स.क्रं. २१७/४अ. म्हसरुळ, नाशिक व स.क्रं. ४४८/५+६, मखमलाबाद, नाशिक स.क्रं. ४३/२ब/२ व ४३/ब/१अ/२ पंचक, नाशिक**

## अटी व शर्ती (अर्जदारास बंधनकारक)

१. अर्ज सादर करावयाच्या दिनांकी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

२. विहित नमुन्यातील छपाई अर्जाची किंमत १०५/-आहे.अर्ज टपालाने अथवा कुरिअर सेवाद्वारे स्विकारले जाणार नाही.

३. अर्ज सादर करावयाच्या दिनांकाच्या मागील २० वर्षापैकी किमान सलग १५ वर्षे महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये वास्तव्य आवश्यक यासाठी

अ) नोकरीचे १५ वर्षाचे प्रमाणपत्र ब) शिक्षणाचे व नोकरीचे मिळून प्रमाणपत्र

क) तहसिलदाराचा दाखला (Domecile Certificate) यापैकी कोणताही एक दाखला सादर करावा.

४. पात्र अर्जदारांना सदनिका ताब्यात घेतल्यानंतर ३ महिन्यात सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करावी लागेल. घरांसाठी लागणारा पाणी पुरवठा, नळजोड, सामाईक विद्युत जोड इ. साठी आवश्यक ते शुल्क/अनामत रक्कम भरुन अनुक्रमे स्थानिक महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य विद्दयुत कंपनी लिमिटेड कडून संस्थेस स्वखर्चाने दयावे लागेल. तसेच मालमत्ताकर,पाणी देयक पाण्याची व विजेची देयके इ. खर्च सदनिकाधारकानां सहकारी संस्थेच्या माध्यमातून संबंधितांकडे परस्पर भरावे लागेल. अंतर्गत ड्रेनेज /अंतर्गत पाणीपुरवठा यंत्रणा व इतर सामाईक सुविधांची देखभाल, दुरुस्ती सहकारी संस्थेस करावयाची आहे.

५. सदर किंमतीमध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही कराचा समावेश नाही. म.न.पा. यांनी मागणी केल्यानुसार सर्व प्रकारचे कर परस्पर सदनिकाधारकास भरावे लागतील.

६. महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी लिमिटेड यांच्या मागणीनुसार अनामत रक्कम भरुन प्रत्येक सदनिका धारकाने वैयक्तिक वीज जोड घ्यावयाचा आहे.

७. शासन निर्णयानुसार अनुसुचित जाती,(एस.सी), अनुसुचित जमाती(एस.टी), भटक्या जमाती(एन.टी), विमुक्त जाती(व्ही.जे) या प्रवर्गातील यशस्वी अर्जदारांनी सक्षम प्राधिका-याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र (Cast Validity Certificate) सादर करणे अनिवार्य राहील,सदर जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय सदनिका वाटप करता येणार नाही.

८. म.गृ.नि. व क्षे.वि. प्राधिकरण वरील योजनेत परिस्थितीनुसार बदल व सुधारणा करण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

९. अर्जदाराचे ज्या बँकेत खाते आहे त्या बॅकेचे नाव,शाखा,बॅक खाते क्रमांक इत्यादी माहिती अर्जामध्ये नमुद करणे बंधनकारक आहे.

१०. अर्ज हे सुवाच्य अक्षरात अचूक व परिपूर्ण भरलेले असावेत तसेच त्यासोबत वय,रहिवास,उत्पन्न या साठी आवश्यक पात्रतेचे पुरावे जोडावेत तसेच अर्जासोबत भरावयाच्या रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. अर्जासोबत जोडावा डी. डी. हा **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अथवा म्हाडा,नाशिक** या नावाने घेवून तो **नाशिक** शाखेवर देय असावा.

११. चटई क्षेत्र / बांधकाम क्षेत्रात किरकोळ बदल संभवतात.

१२. योजनेतील प्रति सदनिका किंमत अंदाजित असून बांधकाम व विकास कामे पुर्ण झाल्यवर प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे योजनेतील सदनिकाची अंतिम विक्री किंमत काढण्यात येईल.त्यानुसार विक्री किंमतीत वाढ झाल्यास वाढीव रकमेचा भरणा करणे सदनिकाधारकावर बंधनकारक राहील.

१३. नाशिक मंडळाने सदनिका वितरणाचे देकार पत्र दिल्यानंतर लाभार्थीने आपला अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेली अनामत रक्कम पूर्ण कपात करण्यांत येईल. तथापि, अर्जदाराने आपला अर्ज देकार पत्र देण्यापुर्वी मागे घेतला तर अनामत रक्कमेतून रुपये १०००/- प्रशासकीय खर्च वजा करुन बाकी रक्कम बिन व्याजी परत करण्यांत येईल. अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज देय नाही.

१४. सदनिकेचा ताबा घेण्यापुर्वी मा.मुद्रांक नियंत्रक व नोंदणी महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २७/१०/२००४ रोजीच्या परिपत्रकानुसार सदनिकेच्या किंमतीवर विहीत दराने नियमानुसार मुद्रांक शुल्काचा भरणा करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

१५. पात्रते बाबतची कागदपत्रे मागणी केल्यावर विहीत कालावधीत सादर करावी लागतील.

१६. सदर सदनिकेची किंमत ही दि.३१/१२/२०१५ पर्यत परिगणीत केलेली असून,तद्नंतर नियमाप्रमाणे व्याज भांडवलीकरणाची रक्कम अतिरिक्त भरावी लागेल.

१७. सदनिकांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार सदनिकाच्या विगतवारीत बदल संभवतो.

१८. सदनिकाधारकांना सदनिकेत कोणताही बदल करण्याची परवानगी नसून तळमजल्यावरील सदनिकाधारकांना सदनिके व्यतिरीक्त कोणतीही जागा व्यापता येणार नाही. अन्यथा अनधिकृत फेरफार व बांधकामाच्या विरोधात रितसर कार्यवाही करण्यात येईल.

**१९. अर्जदारास सदनिका किंमती व्यतिरिक्त सदनिकेचा ताबा घेण्यापुर्वी म्हाडा निश्चित करेल त्याप्रमाणे किमान १ वर्षाचे देखभाल दुरुस्ती सेवा शुल्क भरणे अनिवार्य आहे.**

**(सरिता नरके )**
**मुख्य अधिकारी**
**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक.**